# ५. उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन

## ५.१ बीज-भांडवल योजना

दि. १ ऑक्टोबर. १९९३ पासून नवीन बीज-भांडवल सहाय्य योजना कार्यान्वित झाली आहे. या योजनेखाली किमान ७ वी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या व १८ ते ५० वयोगटातील व्यक्ती (पुरूष किंवा महिला) अर्थसहाय्य मिळवण्यास पात्र आहेत. ही योजना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविली जाते. प्रकल्प खर्च १ ते १० लक्ष रूपयांपर्यंत असेल तर प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के रक्कम बीज-भांडवल सहाय्य म्हणून दिले जाते. प्रकल्प खर्च १ लाख रूपयाच्या आत असलेल्या प्रकल्पांसाठी प्रकल्प खर्चाच्या २० टक्के आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्ग व अनुसूचित जाती यांच्यासाठी २२.५० टक्के अर्थसहाय्य दिले जाते. हे अर्थसहाय्य कर्ज स्वरूपात असून प्रति वर्ष व्याज दर १० टक्के आहे. कर्जफेड कर्ज दिल्यानंतर तीन वर्षापासून ७ वर्षापर्यंत वार्षिक ४ हप्त्या करावयाची आहे.

---

**संपर्क : जिल्हा उद्योग केंद्र (सर्व जिल्हे)**

---

## ५.२ पंतप्रधानांची रोजगार योजना (पीएमआरवाय)

पंतप्रधानांची रोजगार योजना शहरी तसेच ग्रामीण भागात राबविण्यात येते. ही योजना जिल्हा उद्योग केंद्र व जिल्हा नगर विकास संस्थेमार्फत राबविण्यात येते. ज्या व्यक्तिचे वार्षिक कौटुंबिक उत्प रू.४०,०००/- पर्यंत आहे, वय १८ ते ३५ पर्यत आहे व शैक्षणिक गुणवत्ता किमान १० वी पास अथवा नापास व आय.टी.आय कि वा सरकारमान्य संस्थेतून कमीत कमी सहा महिन्यांचा तांत्रिक/प्रशिक्षण कोर्स पास असला पाहिजे अशी व्यक्ती या योजनेसाठी अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहे. या योजनेखाली उद्योजक कोणताही उद्योग, सेवाउद्योग किंवा व्यापारासाठी कर्ज घेवू शकतो. वैयक्तिक उद्योजकांच्या बाबतीत प्रकल्प खर्च १ लक्ष रूपयांपर्यंत असावा, जर २ किंवा अधिक व्यक्तिंना भागीदाराने उद्योग सुरू करावयाचा असेल

तर प्रकल्प खर्चातील प्रत्येकाचा हिस्सा जास्तीत जास्त १ लक्ष रूपये असावा. प्रकल्प खर्चापैकी ५ टक्के उद्योजकांनी उभारावयाचा आहे. उर्वरित ९५ टक्के रक्कम बँकाकडून कर्जरूपाने मंजूर होईल. केंद्र शासन प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के, प्रति उद्योजक जास्तीत जास्त ७५००/- रूपये अनुदान देईल. सुरूवातीचा ६ ते १८ महिन्याचा कालावधी सोडून कर्ज परतफेड कालावधी ३ ते ७ वर्षापर्यंत असेल.

**टिप :** उद्योग विभागाची बीज-भांडवल सहाय्य योजना व पंतप्रधानाची रोजगार योजना या दोन्ही योजना या सर्वसाधारण योजना आहेत. तथापि या योजनांचा लाभ महिलांनाही घेता येईल.

---

संपर्क : **उद्योग सह संचालक, जिल्हा उद्योग केंद्र**

---

# ६. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

## ६.१ महिला उद्यम निधी योजना

या योजनेखाली महिला उद्योजकांना १० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकल्प खर्चातील त्रुटी भरून काढण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या कमाल १५ टक्के अधिक ठेवून समन्याय पद्धतीचे अर्थसहाय्य देण्यात येते. या अर्थसहाय्यास प्रकल्प खर्चाच्या २५ किंवा जास्तीत जास्त २.५० लाक्ष रूपये अशी वाढ करण्यात आली आहे. महिला उद्योजकांना प्रकल्प खर्चात १०टक्के सहभाग अपेक्षित आहे. भागीदारी/ खाजगी मर्यादित कंपन्यांच्या बाबतीत महिला उद्योजकांचा कमीत कमी ५१ टक्के सहभाग असणे आवश्यक आहे. हे अर्थसहाय्य घेताना महिला उद्योजकांना सर्वसामान्य अटी पूर्ण कराव्या लागतात. आता या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली असून वाहतूक कर्ज सोडून उतर कोणत्याही औद्योगिक उत्पादनासाठी या योजनेखाली अर्थसहाय्य पुरविण्यात येते.

---

**संपर्क : महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई**

# ७. कृषि विभाग, महाराष्ट्र शासन

## ७.१ कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग

कृषि क्षेत्रात महिलांचा अधिक कार्यक्षम सहभाग ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यातील एका तालुक्यात राबविण्यात येणार असून या योजनेचा प्रमुख उद्देश महिला शेतकऱ्यांचे गट स्थापन करुन शेती व शेती पूरक व्यवसाय व्यवस्थापनेत त्यांना आत्मनिर्भर करणे, नवीन तंत्रज्ञानाविषयी प्रशिक्षण देणे, प्रात्यक्षिके व व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे हा आहे.

**संपर्क : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

## ७.२ जिजामाता कृषीभूषण पुरस्कार

संपूर्ण महाराष्ट्रातून कृषीक्षेत्रात उत्कृष्ठ काम करणाऱ्या दोन महिला शेतकऱ्यांना जिजामाता कृषीभूषण पुरस्कार देण्यात येता. हा पुरस्कार कृषी विभागामार्फत देण्यात येतो.

**संपर्क : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा कृषि अधिकारी (सर्व जिल्हे)**

# ८. शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## ८.१ मुलींची पटसंख्या वाढविण्याकरीता प्राथमिक शिक्षकांना उत्तेजनार्थ पारितोषिके

ग्रामीण भागात मुलींना शाळेत पाठविण्यास पालक इच्छुक नसतात, अशा परिस्थितीत शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन मुलींना शाळेत पाठविण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्राथमिक शिक्षकांची मदत घेण्यात येते व त्याकरिता त्यांना पारितोषिके देण्यात येतात. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील स्त्री-शिक्षिकांना हा पुरस्कार देण्यात येतो.

---

संपर्क : संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
संचालक (माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे

---

## ८.२ सावित्रीबाई फुले आदर्श स्त्री शिक्षिका पुरस्कार

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील स्त्री-शिक्षिकांना हा पुरस्कार देण्यात येतो.

---

संपर्क : संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
संचालक (माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे

---

## ८.३ राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना

राज्यातील प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलांसाठी अपघात विमा योजना सुरु केली असून, या योजनेअंतर्गत एकत्रित विमा हप्ता राज्य शासनाने भरला आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थी मृत्यू पावल्यास, पालकांना विम्याची रक्कम दिली जाते. तसेच अपघात उपचारासाठी खर्च, चष्मा फुटल्यास, पुस्तक, सायकल हरविल्यास विशिष्ट मर्यादेपर्यंत रक्कम विद्यार्थ्यांना मिळते.

---

संपर्क : **गट शिक्षणाधिकारी (सर्व तालुके)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (सर्व जिल्हे)**

# १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## १.१ सावित्रीबाई फुले कल्याण योजना

उच्च शिक्षणासाठी देशाच्या निरनिराळ्या भागातून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने मुंबईत येतात. त्यांच्या राहण्याची सोय व्हावी या हेतूने शासनाने सावित्रीदेवी फुले छात्रालय, मुंबई हे केवळ मुलींसाठी असलेले वसतीगृह सुरु केलेले आहे. या वसतिगृहाची क्षमता ४५४ आहे.

---

**संपर्क : अधिक्षक, सावित्रीबाई फुले छात्रालय, मुंबई**

---

## १.२ शासकीय तंत्रनिकेतनात मुलींसाठी वसतिगृह बांधणे

मुलींना तांत्रिक उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांची राहण्याची सोय नाही म्हणून, त्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागू नये यासाठी वसतिगृह योजना राबविण्यात येत आहे.

---

**संपर्क : संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई**

---

## १.३ महिलांसाठी व्यवसाय शिक्षणाचे प्रशिक्षण

व्यवसाय शिक्षणामध्ये महिलांचा सहभाग ही आवश्यक बाब समजून, शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या जागांच्या २५ % इतक्या जागा महिला प्रशिक्षणार्थ्यांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात महिलांसाठी १५ स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या आहेत. ज्या तालुक्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाहीत अशा प्रत्येक तालुक्यात एक प्रशिक्षण संस्था स्थापन करून, जर त्या ठिकाणी ४ व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात येत असेल, तर त्यापैकी १ व्यवसाय व ज्या ठिकाणी ६ व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात येत असेल तर

त्यापैकी दोन व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रम महिलांसाठी स्वतंत्र सुरु करण्यात येत आहेत. राज्यात ३४७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ६३,३३२ इतक्या जागा असून पैकी २१,९०५ इतक्या जागा महिलांकरिता राखीव आहेत.

संपर्क : **संचालक, (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई**

## ९.४ महिला महाविद्यालये

राज्यामध्ये एकूण १०४ अशासकीय अनुदानित महिला महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमध्ये कला, वाणिज्य व विज्ञानशाखा असून ही त्या त्या विभागातील विद्यापीठाशी अथवा श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी या विद्यापीठाशी संलग्नीत आहेत. या महाविद्यालयांना १०० टक्के वेतन अनुदान व मान्य खर्चाएवढे वेतनेत्तर अनुदान दिले जाते. या महिला महाविद्यालयांसाठी स्वतंत्र अशी आर्थिक तरतूद केली जात नाही. शैक्षणिक संस्थाकडून महिला महाविद्यालय सुरु करण्यासाठी, विद्यापीठामार्फत शासनाकडे अर्ज सादर केला जातो. शासन, विद्यापीठाची शिफारस व अन्य बाबी पाहून महिला महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देते.

संपर्क : **संचालक, उच्च शिक्षण, पुणे**

## ९.५ विद्यापीठ (महिला विद्यापीठ)

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठामार्फत महिलांच्या उच्च शिक्षणासाठी, वेगवेगळ्या पदविका, पदव्या प्रदान करण्यासाठी विविध शाखांचे शिक्षण तसेच तंत्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.याकरिता राज्यशासन या विद्यापीठास अनुदान देते. सदर विद्यापीठ महिलांसाठी चालविण्यात येणार राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे. याशिवाय अन्य विद्यापीठातही महिलांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत.

---

**संपर्क : रजिस्ट्रार, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई**

---

## ९.६ तंत्र निकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये

राज्यात एकूण २५० तंत्रनिकेतने आहेत. त्यापैकी ७० फॉर्मसी एकून एकूण तंत्र निकेतनांपैकी ४१ शासकीय तंत्रनिकतने आहेत. या शिवाय ३६१ तंत्र माध्यमिक विद्यालये तसेच १० अधिक २ स्तरावरील किमान कौशल्य / द्विलक्षी अभ्यासक्रम शिकविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

राज्यात १४७ अभियांत्रिकी महाविद्यालये असून त्यापैकी ६, शासकीय महाविद्यालये आहेत. या शिवाय ३१ वास्तूशास्त्र महाविद्यालये,९० व्यवस्थापन शास्त्रविषयक अभ्यासक्रम, ५२ औषधनिर्माण शास्त्रविषयक अभ्यासक्रम तर ८ ठिकाणी हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी-विषयक अभ्यासक्रम शिकविण्याची सुविधा आहे.

---

**संपर्क : संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई**

---

## १.७ कला संस्था

कला शिक्षण व कलेविषयीच्या कार्यक्रमांशी संबंधित असणाऱ्या बाबी कला संचालनालयामार्फत नियंत्रित केल्या जातात. राज्यात एकूण १७३ कला महाविद्यालये (चित्रकला) असून त्यापैकी ४ शासकीय महाविद्यालये आहेत.

कला संचालनालयामार्फत खालील कामे नियंत्रित केली जातात

- सर्वसामान्य शिक्षण व्यवस्थेतील कला शिक्षण,
- माध्यमिक शिक्षणामधील उच्च स्तरावरील खास कला शिक्षण
- व्यावसायिक कलाकार व कला विद्यार्थी यांचेसाठी राज्यस्तरीय कला प्रदर्शने आयोजित करणे,
- दृक कलेच्या द्वारे सर्वसामान्य जनतेमध्ये सौंदर्य अभिरूची निर्माण करणे.

याशिवाय माजी पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनी म्हणजे १४ नोव्हेंबर रोजी बाल चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येतात व बक्षिसेही देण्यात येतात.

---

**संपर्क : संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

---

## १.८ शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण

औद्योगिक क्षेत्रात प्रशिक्षणाची पातळी सुधारण्याच्या दृष्टीने शिकाऊ उमेदवार अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. ही योजना राबविण्यासाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राज्य शिक्षणार्थी सल्लागार म्हणून नेमले आहे. या विभागाचे महत्त्वाचे काम म्हणजे शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१ अन्वये खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील प्रशिक्षणाचे नियंत्रण आणि विनियमन करणे हे होय. तसेच, ही योजना राबविण्यासाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखाली महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर ही सहा प्रादेशिक

कार्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत. उप संचालक यांना शिक्षणार्थी उप सल्लागार (व) या पदाचा दर्जा देऊन प्रादेशिक कार्यालयाच्या व मुख्य कार्यालयाच्या कक्षेत येणाऱ्या खाजगी, निमसरकारी व सरकारी क्षेत्रातील आस्थापनांचे शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१, अन्वये सर्वेक्षण / पुनःसर्वेक्षण, पाठपुरावा, शिकाऊ उमेदवारांनी औद्योगिक कारखान्यात अभ्यासक्रमांनुसार केलेल्या प्रत्यक्ष कामाची तपासणी करणे, परीक्षा घेणे तसेच मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रे चालविणे वगैरे कामे या योजने अंतर्गत करण्यात येतात.

राज्य पातळीवर औद्योगिक, खाजगी व निमसरकारी या स्तरावरील शिकाऊ उमेदवारी योजना अधिक कार्यक्षमतेने राबविण्यासाठी त्यांच्या अडीअडचणीबाबत मार्गदर्शन वगैरेसंबंधी समन्वय साधण्यासाठी, शिकाऊ उमेदवारांच्या व संबंधितांच्या सभा बोलविणे, चर्चा सत्र आयोजिणे इत्यादी कार्यक्रमसुद्धा आखले जातात. सदर योजना राबविण्यासाठी सरकारने निरनिराळ्या समित्या नेमलेल्या आहेत. उदा. एन.सी.व्ही.टी.सी.ए.सी. वगैरे. सदर समित्यांच्या सभांना संचालकांनी उपस्थित राहणे आवश्यक असते. ही योजना कार्यक्षमतेने राबविण्यासाठी सदर समित्यांमध्ये निरनिराळ्या विषयावर निर्णय घेतले जातात. प्रशिक्षणामध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेचा समावेश आहे. ही योजना राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून राबविली जाते.

महाराष्ट्रात शासनाची एकूण ४८ व अशासकीय ६७ एकूण ११५ मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रे स्थापन झालेली आहेत. तसेच, सध्या या योजनेखाली महाराष्ट्र राज्यात एकंदर २६,५२४ शिकाऊ उमेदवार निरनिराळ्या व्यवसायात प्रशिक्षण घेत आहेत.

---

**संपर्क : संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# १०. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

## १०.१ मातृत्व अनुदान योजना

आदिवासी उपयोजनेखाली ठाणे, नाशिक, नंदूरबार, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासी गर्भवती मातांना प्रसूतीपूर्व तीन महिने व नोंदणी प्रसवोत्तर एक महिना असे १६ आठवड्याकरिता बाळंतपणासाठी प्रत्येकी रूपये ८०० प्रमाणे अनुदान देण्यात येते. प्रसूतीपूर्व नोंदणी करणे व तपासणी नियमित करणे, यासाठी आदिवासी महिलांना उद्युक्त करण्याकरिता ही योजना राबविण्यात येत आहे. सदर अनुदानापैकी रूपये ४०० रोख व रूपये ४०० औषध स्वरूपात खर्च करण्यात येतो. अनुदान खाली टप्प्यात मंजूर करण्यात येते.

| | |
|---|---|
| - गरोदरपणाच्या १६ व्या आठवड्यात नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नोंदणी केल्यास | रूपये २०० |
| - गरोदरपणाच्या सातव्या महिन्यात - | रूपये २०० |
| - गरोदरपणाच्या नवव्या महिन्यात - | रूपये २०० |
| - प्रसुती झाल्यानंतर - | रूपये २०० |

**संपर्क : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (१५ आदिवासी जिल्हे)**

## १०.२ राष्ट्रीय पुनरूत्पादित व बालआरोग्य कार्यक्रम

### अवघड प्रसुतीसाठी वाहन सुविधा

ग्रामीण भागातील स्त्रीस अवघडलेल्या जोखमीचे प्रसुतीचे गंभीर वेळी जवळच्या, आरोग्य संस्थेस जाण्यासाठी वाहन उपलब्ध होत नाहीत व अशा तऱ्हेने सदरहू प्रसुती घरीच वा इतरत्र होते व प्रसूत स्त्रीस विशेषज्ञांच्या सेवाही उपलब्ध होत नाहीत. जोखमीच्या प्रसुतीचे वेळी अशा परिस्थितीत माता दगावण्याचीसुद्धा शक्यता असते त्यावर मात करण्याचे दृष्टीने शासनाने वर्ष २००१-२००२ मध्ये राज्यातील निवडक १३ जिल्ह्यांतील दाईमार्फत होणाऱ्या प्रसुतींचे प्रमाण जास्त असणाऱ्या २५ टक्के आहे.८७७ उपकेंद्रांचे कार्यक्षेत्रातील एकूण १,७४६ ग्रामपंचायतीमार्फत अशा तऱ्हेच्या अवघडलेल्या गर्भार स्त्रीला जवळच्या आरोग्य संस्थेत जाण्यासाठी प्रती लाभार्थी रूपये ३००चे मर्यादित अशा तऱ्हेने वाहन खर्च दिला जाणार आहे.

---

**संपर्क :** अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण
जिल्हा आरोग्य अधिकारी

---

# ११. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन

## ११.१ राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना

रॉकेल, पेट्राल, कोळसा यासारख्या पारंपारिक ऊर्जा साधनांची बचत करण्यासाठी राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना असून बायोगॅस सयंत्रे बसविण्यासाठी होणारा संपूर्ण खर्च केंद्र शासनाच्या अनुदानातून भागविण्यात येतो. बायोगॅस संयंत्र दुरूस्ती करण्यासाठी, प्रत्येक संस्थेमागे ७५० रूपये इतका खर्च, केंद्र शासनाने जिल्हा परिषदेला टर्न फी पोटी मंजूर केलेल्या अनुदानातून करण्यात येतो. बायोगॅस संयंत्राची बांधणी तंत्रशुद्ध व्हावी म्हणून, गवंड्यांचे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात. या कार्यक्रमामुळे महिलांना इंधनासाठी लाकूड, कोळसा, रॉकेल हे मिळविण्यासाठी जी पायपीट करावी लागते ती कमी होण्यास मदत झाली आहे.

कार्यक्रमातील लाभार्थी व अनुदानाचे दर : या योजनेत विविध आकाराच्या सर्व सयंत्रांसाठी केंद्र शासनाने निर्धारीत केलेले अनुदानाचे दर खालील प्रमाणे आहेत.

| *अ. क्र.* | *लाभार्थी प्रवर्ग* | *संयंत्राचे आकारमान* | *प्रति संयंत्र अनुदान* |
|---|---|---|---|
| १. | अनु. जाती / जमाती, दारिद्र्य रेषेखालील भूमीहीन व अल्पभूधारक | १ ते १० घनमीटर | रु. २३००/- |
| २. | सर्वसाधारण लाभार्थीसाठी | -''- | रु. १८००/- |
| ३. | संयंत्रास संडास जोडणीसाठी अतिरिक्त अनुदान | -- | रु. ५००/- |
| ४. | जुन्या संयंत्राची दुरुस्तीसाठी (किमान ५ वर्ष कालावधीचे व स्ट्रक्चरल दुरुस्तीअभावी बंद असलेल्या संयंत्राची दुरुस्तीसाठी) | -- | सर्वसाधारण लाभार्थीसाठी रु. ९००/- किंवा अनु. जाती/ जमाती, दारिद्र्य रेषेखालील भूमीहीन व अल्पभूधारकासाठी रु. ११५०/- |

बायोगॅस सयंत्र धारकास सयंत्र बांधण्यासाठी अनुदानापेक्षा जास्त खर्च येतो. हा खर्च लाभधारकाने स्वतः करावयाचा असतो किंवा यासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जही उपलब्ध होऊ शकते.

**संपर्क : कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)**

## ११.२ सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल १९९९ पासून एकात्मिक विकास कार्यक्रम, ट्रायसेम, ड्वाक्रा, दशलक्ष विहिर योजना व गंगा कल्याण योजना या सर्व योजना एकत्रित करून स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासन हिस्सा ७५:२५ असा आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना बँकेकडून कर्ज व शासकीय अनुदान देऊन स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे व लाभ देण्यात आलेल्या कुटुंबाना तीन वर्षात दारिद्र्य रेषेच्यावर आणणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी, स्थानिक स्तरावर ग्रामीण जनतेच्या क्षमतेच्या वापर करून लहान लहान उद्योग निर्मितीची साधने निर्माण करून, पुरेसा रोजगार निर्माण करणे ग्रामीण लोकांमध्ये स्वयंसहाय्यता गट निर्माण करणे, कार्यक्रमाचे नियोजन करणे, मूलभूत सोयी विकास व तांत्रिक कौशल्य आणि विपणन व्यवस्था निर्माण करण्यात येते. या योजनेखाली प्रकल्प खर्चाच्या ३०% किंवा जास्तीत जास्त रूपये ७,५०० इतके अनुदान देण्यात येते. अनुसूचित जाती / जमातीसाठी ही मर्यादा प्रकल्प खर्चाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रूपये १०,००० अशी आहे स्वयंरोजगाराच्या गट समुहासाठी ही मर्यादा प्रकल्प खर्चाच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रूपये १.२५ लक्ष इतकी आहे. या योजनेखाली एकूण उद्दिष्टाच्या ४०% महिला लाभार्थ्यांचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे.

**संपर्क : प्रकल्प संचालक, जिल्हर ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व जिल्हे)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)**

## ११.३ इंदिरा आवास योजना

या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना नवीन घरकुल बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्ती आणि मुक्त वेठबिगार तसेच अन्य गरीब व्यक्तीनांही मोफत घरे उपलब्ध करून दिली जातात. घराचे क्षेत्रफळ अंदाजे २५० चौरस फूट इतके असते. नवीन घरकुलाची अंदाजे किमंत ३०,००० रूपये निश्चित करण्यात आली असून त्यापैकी २०,००० अनुदानातून ८,५०० रूपये राज्य शासनाकडून उपलब्ध निधीमधून देण्यात येतात तर रूपये १५०० लाभार्थ्यांच्या मजुरीच्या रूपात असते. **घरकुल हे घरातील महिलेच्या नावाने अथवा महिला आणि तिच्या पतीच्या संयुक्त नावाने नोंद करून देण्यात येते.**

---

संपर्क : **प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)**
**ग्राम सेवक (ग्राम स्तरावर)**

---

## ११.४ संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

संपूर्ण रोजगार योजनेचे ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अकुशल व्यक्तींना गावातच अतिरिक्त रोजगार मिळवून देणे व त्याद्वारे त्यांना अनुदान मिळण्याची शाश्वती देऊन पोषण विषयक दर्जा सुधारणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक विकासासाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे दुय्यम उद्दिष्ट आहे. या योजनेखाली रोजगार उपलब्ध करून दिल्यानंतर लाभार्थीस अधान्य आणि रकमेच्या स्वरूपात मोबदला देण्यात येतो.

---

संपर्क : **प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)**
**ग्राम सेवक (ग्राम स्तरावर)**

---

# १२. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

## १२.१ ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम

एप्रिल १९९९ पासून केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत कार्यक्रमासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ग्रामीण भागात केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्याचा प्रकल्प केंद्र शासनाने मंजूर केलेला असून त्यानुसारच याची अंमलबजावणीकरण्यात येत आहे या कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक शौचालयासाठी असलेल्या अनुदानात भरीव कपात करुन रु. १,०००/- पर्यंतच्या जोत्यापर्यंतच्या बांधकामासाठी जास्तीत जास्त रु. ५००/- इतके सिमित केले. यापैकी रु. ३७५/- केंद्र शासनाचा हिस्सा व रु. १२५/- राज्य शासनाचा हिस्सा आहे. तसेच सदर अनुदान फक्त दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यास, अनुज्ञेय आहे.

या कार्यक्रमाखाली बांधण्यात येणाऱ्या वैयक्तिक शौचालयाच्या देय असलेल्या अनुदानाचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे. जमिनीवरील बांधकाम लाभार्थ्यांनी स्वतःच्या ऐपतीप्रमाणे व इच्छेप्रमाणे करावयाचे असून जोत्यापर्यंतच्या मुलभूत बांधकामासाठीच्या खर्चाप्रमाणे शासकीय अनुदान देय आहे.

| अ. क्र. | कमी अनुदानाच्या मुलभूत स्वच्छता गृहाची किंमत | हिस्सा (टक्केवारी) | | |
|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | लाभधारक |
| १. | रु. ६२५ पर्यंत | ६०% पर्यंत | २०% | २०% |
| २. | रु. ६२५ ते १,०००/- | ३०% | ३०% | ४०% |
| ३. | रु. १,०००/- पेक्षा जास्त | निरंक | -- | -- |

या कार्यक्रमांतर्गत केवळ शौचालये न बांधता स्वच्छतेच्या अन्य बाबी जसे शोषखड्डे घेणे, शाळांतून स्वच्छतागृहांची सोय करणे, माहिती व लोकशिक्षणाचा कार्यक्रम राबविणे, आवश्यक तेथे महिलांसाठी सामुहिक स्वच्छतागृहे बांधणे, स्वच्छताविषयक साहित्याची उत्पादन तथा विक्री केंद्रे उभारणे इत्यादीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ह्यासाठी होणाऱ्या खर्चाची विभागणी पुढीलप्रमाणे आहे.

| *अ. क्र.* | *संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे घटक* | *संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमाच्या प्रकल्प खर्चापैकी राखून ठेवलेला निधी* | *हिस्सा (टक्केवारी)* | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | *केंद्र* | *राज्य* | *लाभधारक* |
| १. | प्राथमिक कामकाज (सर्वेक्षण, प्रसिद्धी, इ.) | ५% | १०० | ० | ० |
| २. | लोकशिक्षण | किमान १५% | ८० | २० | ० |
| ३. | पर्यायी वितरण व्यवस्था (उत्पादन केंद्रे, विक्री केंद्रे) | ५% पर्यंत | ८० | २० | ० |
| ४. | वैयक्तिक शौचालये व महिलांसाठी सामुहिक स्वच्छतागृहांसाठी बांधकाम साहित्याची व्यवस्था | ६०% | ६० | २० | २० |
| ५. | शालेय स्वच्छता कार्यक्रम | १०% | ६० | ३० | १० |
| ६. | प्रशासकीय खर्च | ५% | ८० | २० | ० |

याशिवाय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत रस्त्यालगतची उघडी गटारे बांधण्याकरिता जिल्हा परिषदेला एकूण खर्चाच्या ६० टक्के इतके अनुदान शासनाकडून दिले जाते व उर्वरित ४० टक्के खर्च संबंधित स्थानिक संस्थांनी करावयाचा आहे. त्यामध्ये हा कार्यक्रम राबविला जातो. गटाराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्याच्या देखभालीची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची/ग्रामपंचायतीची आहे. त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही.

**संपर्क : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)**

# १३. पशुसंवर्धन विभाग

## १३.१ दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा व खाद्य अनुदान

या कार्यक्रमाखाली लाभार्थ्यांस २ म्हैशी/ गायी पुरविण्यात येतात.याकरिता ५०% अनुदान देय आहे. एका वेळी एक दूध देणारी म्हैस / गाय पुरविल्यानंतर दुसरी म्हैस / गाय पुरविण्यात येते. अनुसूचित जाती / जमातीच्या लाभार्थींना ५०% अनुदान देय आहे.,

हा कार्यक्रम निवडक जिल्ह्यातून राबविली जातो. विशेषत: दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील लाभार्थीस व दुभत्या जनावरांच्या खरेदीकरता एकूण किमंतीच्या ५०% तथापि रूपये ३,००० च्या मर्यादित अनुदान दिले जाते. या दुभत्या जनावरांना पौष्टीक पशुखाद्य आहार पुरविण्यासाठी प्रत्येकी रूपये २०० प्रमाणे ४० दिवसांकरिता होणारा खर्च लाभार्थीस दिला जातो.

---

संपर्क : पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक

---

## १३.२ शेळ्यांचे गट वाटप

सन १९९४-९५ या वर्षापासून सदरची योजना विशेष घटक योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेखाली प्रत्येक लाभार्थ्याला १० शेळ्या व १ बोकड याप्रमाणे मेंढ्याचे / शेळ्यांचे वाटप करण्यात येते. यासाठी रूपये ७९,००० ते रूपये १,१२,००० इतका खर्च अपेक्षित आहे. या एकूण खर्चापैकी ७५% रक्कम कर्ज रूपाने २०% अनुदान व ५% स्वत: लाभार्थींना उभा करावयाची आहे. अनुसूचित जाती / नवबौद्ध कुटुंबांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

---

संपर्क : पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक

---

## १३.३ तलंगाचे गट वाटप

ग्रामीण भागात कुक्कुट पालन व त्यांना पूरक उत्पाचे साधन प्राप्त व्हावे म्हणून, राज्यात १६ सधन कुक्कट विकास गट स्थापन करण्यात आले आहे. या गटांमार्फत सुधारित जातीच्या कोंबड्यांची अंडी उबवण्यासाठी वाटप करणे व पिल्ले वाटप करणे तसेच गावठी जातीच्या कोंबड्यांची प्रत सुधारण्यासाठी आणि पैदाईशीसाठी सुधारित जातीचे नर ना नफा ना तोटा तत्वावर पुरविणे, रोग प्रतिबंधक लसीकरण करणे, व्यावसायिकांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या साठी प्रशिक्षण देणे इ. कार्यक्रम राबविले जातात.

अनुसूचित जाती / जमाती, नवबौद्ध अल्प, अत्यल्प भूधारक व शेतमजूर यांचेसाठी ८ ते १० आठवडे वयाच्या १० तंलगा व १ नगर कोंबडा अशा गटाचे वाटप करण्याची योजनाही राबविली जाते. या योजनेखाली ३०% महिला लाभार्थी असणे अपेक्षित आहे.

**संपर्क : पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती**
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद**
**जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक**

## १३.४ संकरित कालवडी/ म्हशींच्या सुधारित जातीच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य

या योजनेअंतर्गत राज्यातील अत्यल्प भूधारक अणि भूमीहीन लाभार्थींकडे असलेल्या संकरित कालवडी / दुधाळ पारड्यांना खाद्यपुरवठा करण्यासाठी अनुदान देण्यात येते. कालवडीची योग्य जोपासना होऊन त्या व्याल्यानंतर दूध विक्रीतून लाभार्थ्यांचे उत्प वाढते. हा कार्यक्रम राज्यात २३ जिल्ह्यामध्ये चालू आहे. ४ ते ३२ महिने वयाच्या संकरित कालवडी / दुधाळ म्हशींच्या पारड्यांना २९ महिन्यांच्या कालावधीकरिता १९०० किलो खाद्य या योजनेखाली पुरविण्यात येते.

**संपर्क : पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती**
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद**
**जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक**

# १. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## १.१ शिशुगृह योजना

देशातील अनाथ बेवारस मुलांचे दत्तक विधान भारतामध्येच व्हावे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेखाली एका युनिटमध्ये १० मुले असतात. फक्त परित्याग केलेली (सरेंडर्ड) मुले शिशुगृहात दाखल होऊ शकतात. संस्थांमध्ये मुलांना वैद्यकीय सुविधा, आरोग्य विषयक सेवा, विशेष आहार पुरविण्यात येतो. मुलांचा संगोपन खर्च, कायदे विषयक शुल्क, वैद्यकीय अधिकारी, सोशल वर्कर, आया, नर्सचा पगार या बाबींवर केंद्रशासनामार्फत सहाय्यक अनुदान देण्यात येते.

प्रत्येक संस्थेस दरवर्षी आवर्ती रु. ६,०८,०००/- आणि अनावर्ती खर्चावर रु. ५५,०००/- (सुरुवातीला एकदाच) असे एकूण रु. ६,६३,०००/- संस्थेचा हिस्सा राहतो.

देशातील ज्यास कुटुंबास स्वतःचे मुलबाळ नाही, कुटुंबाची परिस्थिती मुलाचे पालनपोषण करण्यास समर्थ आहे, अशा कुटुंबाना कायदेशीररित्या मुल दत्तक मिळते व मुलासही कुटुंब मिळून त्याचे कायमस्वरुपी पुनर्वसन होते.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## १.२ स्वयंसेवी संघटनांना सर्वसाधारण सहाय्यक अनुदान

महिला व बाल कल्याण क्षेत्रात कार्यरत असलेल्या संघटनांना आर्थिक सहाय्य उपलब्ध नाही. महिला व बाल कल्याण क्षेत्रात ज्या कार्यासाठी स्वतंत्र योजना नाही पण कार्य महत्वाचे आहे. ज्या प्रकल्पातील एखाद्या घटकास आर्थिक सहाय्य उपलब्ध नाही. जे कार्य व्यक्तिच्या स्वावलंबी

होण्यास सहाय्यभूत ठरेल. जो प्रकल्प कोणत्याही योजनांच्या कक्षेत बसत नाही. असे प्रकल्प राबविण्यास त्यांची उपयुक्तता लक्षात घेऊन योजनेअंतर्गत अनुदान मिळू शकते.

**अनुदान पात्र बाबी**

- साधन सामुग्री, पोषण, शिक्षण किरकोळ इत्यादी करता खर्चाच्या ९०%
- इमारत बांधकाम खर्चाच्या ९०% किंवा रू ३.५० लाख यापेक्षा जे कमी असेल ते.

---

संपर्क : **आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## १.३ महिला व बाल विकास क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना संघटनात्मक सहाय्य

महिला व बालकांसाठी कल्याणकाही कार्यक्रम राबविणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना मुख्यत्वे संघटनांचे केंद्रीय कार्यालय समर्थपणे चालविण्याकरता हे अनुदान आहे. बऱ्याच प्रकल्पांना अनुदान अनुज्ञेय असते. पण ते प्रकल्प ज्या संघटनांमार्फत राबविले जातात. त्या संघटनांच्या कार्यालयास कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नाही. असे विविध प्रकल्प कार्यक्रम राबविणाऱ्या संघटनांच्या मुख्य कार्यालयाकरिता (स्टेशनरी, पोस्टेज, साधन सामुग्री, वेतन इ. चे आर्थिक सहाय्य मिळू शकते.

ज्या संघटनांचा वार्षिक खर्च रू ५०,०००/- पेक्षा कमी नाही, अशा संघटनांना जास्तीत जास्त रू ५०,००० किंवा खर्चातील प्रत्यक्ष तूट, यापैकी कमी असेल तेवढे अनुदान मिळू शकते.

---

संपर्क : **आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व जिल्हे)**

## १.४ रस्त्यावरील मुलांच्या कल्याणाची योजना

पूर्णपणे रस्त्यावर राहणारी, दिवसभर रस्त्यावर राहून रात्री घरी जाणारी, कुटुंबासह रस्त्यावर राहणारी व रस्त्यावरच बूटपॉलिश, हमाली करणे, वाहने धुणे, चहा टपरीवर काम करणे अशा प्रकारची कामे करुन चरितार्थ चालविणारी १६ वर्षाखालील मुले रस्त्यावरील मुलांच्या संज्ञेत येतात. ही मुले कौटुंबिक वातावरण, संरक्षण, निवारा इ. प्राथमिक सोयींपासून पूर्णपणे वंचित असतात. या मुलांना संरक्षण पुरविणे, स्वच्छता व स्नानगृहे अशा प्राथमिक सुविधा पुरविणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे व ती जी कामे करतात. त्या कामाचा त्यांना योग्य मोबदला मिळवून देणे व प्राप्त झालेल्या रोजगाराचा योग्य उपयोग करण्याचे मार्गदर्शन करणे, तसेच ते करीत असलेल्या कामातच आवश्यक ते प्रशिक्षण देऊन व अन्य सर्व सहाय्य पुरवून त्यांना स्वावलंबी बनविणे व सोबतच त्यांना शिक्षित व सुसंस्कृत करणे. तसेच शक्य तेथे कुटुंबांशी झालेला त्याचा दुरावा दूर करुन त्यांचे कौटुंबिक समायोजन घडवून आणणे अशा प्रकारचा व्यापक उद्देश या योजनेचा आहे. म्हणून प्रत्येक लाभार्थी बालकाच्या प्रकरणी पुनर्वसनाचा उपक्रम हा स्वतंत्र असतो. ही योजना राबविणाऱ्या स्वयंसेवी संघटनेस महापालिका, पोलिस, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व अन्य सेवाभावी संघटनांचे सहाय्य घ्यावे लागते. ही योजना राबविणाऱ्या स्वयंसेवी संघटनेस ३०० लाभार्थी बालकांच्या एका गटासाठी रु. १५.०० लाखापर्यंत वार्षिक अनुदान अनुज्ञेय आहे. प्रायोगिक तत्वावर ही योजना केंद्र शासनाने महाराष्ट्रात मुंबई, पुणे व नागपूर या तीन शहरात लागू केली आहे. सदरहू योजना १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरासाठीच लागू करण्यात आलेली आहे.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (मुंबई, पुणे, नागपूर)**

## १.५ राष्ट्रीय शिशु कक्ष निधी योजना (पाळणाघर)

पाच वर्षे वयाच्या आतील बालके, ज्यांचे पालक मजूर व तत्संग स्तरातील असून ज्यांचे मासिक उत्पन्न रु. १,८०० पेक्षा कमी आहे, अशी बालके या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. अशा मुलांचे पालक कामावर गेल्यास त्यांना दिवसभर सांभाळण्यासाठी पाळणाघरात ठेवले जाते.

शिशुकक्षांचे दोन प्रकार आहेत.

- साधारण शिशुकक्ष - अंगणवाडीस शिशुकक्ष

**अनुदान :**

- (शिशुकक्ष) २५ मुलांच्या एका कक्षास रु. १८,४८० वार्षिक
- शिशुकक्ष स्थापन व प्रारंभिक खर्च या अनावर्ती खर्चासाठी रु. ४,००० एकदा

**आवर्ती खर्च**

१. दोन सेवकांचे मानधन खर्च मर्यादा : रु. ८०० द.म.

**अनुदान :** रु. ८०० द.म. (१००%)

२. पुरक आहार रु. १.०५ दरडोई दर खर्च मर्यादा : रु. ६८७

**अनुदान :** रु. ६१५ (९०%)

| | |
|---|---|
| तातडीची वैद्यकिय सेवा | रु. १३९० |
| | रु. १३५ |
| | १५४० |
| एकूण | रु. १८,४८० |

शिशुकक्षात आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध केल्या जातात. उदा. पोषण, शालेय पूर्व शिक्षण, मनोरंजन, आरोग्य चिकित्सा इ. सेवा अपेक्षित आहेत.

**संपर्क : बाल विकास प्रकल्प अधिकारी (संबंधित)**

## १.६ राष्ट्रीय बालकोष

(बाल विकास क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमास आर्थिक सहाय्याचा कार्यक्रम) अनुदान पात्र असणारे सेवा कक्ष.

शेतमजूर, बांधकामावरील मजूर गरीब कारागीर अशा असंघटीत पालकांची मुले जी मुले बूटपॉलिश, हमाली, वृत्तपत्र विक्री, कचरा गोळा करणे अशा असंघटीत कामात गुंतलेली आहेत. अशा मुलांकरिता आरोग्य सेवा, शिक्षण, साक्षरता, करमणूक व्यावसायिक प्रशिक्षण व अशाच प्रकारच्या उपयुक्त सेवा पुरविण्यासाठी नाविन्यपूर्ण (पण अन्य योजनांच्या कक्षेत न बसणाऱ्या) प्रकल्प राबविण्यात या निधीतून स्वयंसेवी संस्थांना सहाय्य मिळू शकते.

**सहाय्याची मर्यादा :** एकूण खर्चाच्या ९०% किंवा १.०० लाख रुपये यापैकी जे कमी असेल ते अनुदान फक्त एका वेळेस मिळू शकते.

---

संपर्क : **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास समितीतर्फे बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना

## १.७ शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकली पुरविणे

दुर्गम भागात किंवा इतर ठिकाणी ज्या विद्यार्थीनींना त्यांच्या राहत्या गावापासून, शाळेसाठी कमीत कमी दोन कि.मी. अंतर चालत जावे लागते, अशा विद्यार्थीनींना मोफत सायकली पुरविण्याबाबतची ही योजना आहे. सदर योजनेच लाभ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थीनींना देण्यात येतो. या योजनेखाली किती लाभार्थ्यांना लाभ द्यावा याबाबतचा निर्णय जिल्हा परिषदेने / स्थानिक स्वराज्य संस्थांनी घ्यावयाचा आहे.

---

संपर्क : **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.८ ज्या भागात बालवाड्या / अंगणवाड्या नाहीत, त्या ठिकाणी नवीन बालवाड्या सुरु करणे

ज्या प्रकल्पामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविली जात नाही, तसेच ज्या ठिकाणी शिक्षण विभागाच्या बालवाड्या नाहीत, त्या ठिकाणी महिला व बाल कल्याण समितीमार्फत बालवाड्या सुरु करण्याबाबतची ही योजना आहे. प्राथमिक शिक्षण व बालकांना आरोग्याच्या चांगल्या सवयी व सुसंस्कार घडवून आणण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. सदर बालवाड्या ग्रामपंचायतीमार्फत चालविण्यात येतील व बालवाड्या चालविण्यासाठी प्रत्येक वर्षी एक रकमी रूपये १,००० इतके अनुदान देण्यात येईल. बालवाडीमध्ये किमान ४० पेक्षा जास्त बालके असतील, अशाच ठिकाणी त्या सुरु करण्यात येतील. ही नव्याने सुरु करावयाची योजना आहे. सदर बालवाड्या कोणत्या संस्थामार्फत चालवाव्यात, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

## १.९ ग्रामीण बाल कल्याण रोग निदान शिबीराचे आयोजन

० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करून घेणे आवश्यक असल्याने. त्यानुषांगने औषधोपचार करणेसाठी रोगनिदान शिबिरे आयोजित करण्याची ही नवीन योजना आहे. ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कोणत्याही प्रकारची योजना उपलब्ध नसेल किंवा उपलब्ध असलेली योजना राबविण्यासाठी पैशाची कमतरता असेल, त्या ठिकाणी समितीमार्फत ही योजना घेण्यात यावी. या योजनेवर किती खर्च करावा याबाबत जिल्हा परिषदेने / स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

## १.१० बालवाडीकरिता शैक्षणिक व खेळाचे साहित्य खरेदी करणे

महिला व बालकल्याण समितीमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालवाड्यांतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ते शैक्षणिक व खेळाचे साहित्य सदर समितीस खरेदी करता येईल. मात्र, सदर योजनेवर किती खर्च करावा व कोणत्या बालवाड्यांची निवड करावी याबाबत जिल्हा परिषदेने / स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे. तसेच चालू असलेल्या बालवाड्यांवर खर्च करणे आवश्यक वाटत असेल तर असा खर्च सुद्धा समितीस करता येईल.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.११ अंगणवाड्यांना / बालवाड्यांना साहित्य पुरविणे

एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडीस लागणाऱ्या साहित्याची खरेदी सदर समितीने करावी. त्यासाठी एकात्मिक बाल विकास योजनेमधून खर्च करावा. तथापि, ज्या अंगणवाड्या / बालवाड्या, समिती, स्वतःच्या निधीमधून चालवित आहेत, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.१२ अपंग मुलांना कृत्रिम अवयव बसविणे / त्यांचे पुनर्वसन करणे

ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे, अशा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अपंग मुले, मुली व स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे अत्यंत निकडीचे असल्यास, समितीस यासाठी स्वतःच्या निधीतून खर्च करता येईल. सदर योजनेखाली लाभार्थ्यांची निवड तसेच यासाठी प्रतिवर्षी किती खर्च करावा याबद्दल जिल्हा परिषदेने / स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.१३ शाळेत जाणाऱ्या मुलींना गणवेष वाटप करण्याची योजना

इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलींना गणवेष वाटप करण्याची ही योजना आहे. सर्वसाधारणपणे, ज्या मुलींची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशा मुलींना गणवेषाचे वाटप करता येईल. तथापि, सदर कार्यक्रमाखाली प्रतिवर्षी किती मुलींना गणवेष वाटप करता येईल, तसेच कोणत्या शाळेतील मुलींना गणवेषाचे वाटप करावे, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.१४ आर्थिकदृष्ट्या गरीब मुलींना तांत्रिक व्यवसायाचे प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत

आर्थिकदृष्ट्या गरीब मुलींना तांत्रिक व्यवसायाचे प्रशिक्षण, या योजनेखाली देता येईल व त्यासाठी समितीस अशा मुलींना आर्थिक सहाय्य करता येईल. प्रशिक्षणासाठी खर्च हा कोणता व्यवसाय निवडण्यात आला आहे यावर अवलंबून राहील. अशा प्रशिक्षणासाठी कोणते व्यवसाय निवडावेत व या प्रशिक्षणासाठी किती मुली निवडाव्यात व प्रत्येकी किती रुपये पर्यंत अनुदान द्यावे तसेच या योजनेखाली एकूण किती खर्च करावा, याबाबत जिल्हा परिषदेने स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.१५ आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर

नोकरी करणाऱ्या किंवा शेतावर कामासाठी जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी या योजनेखाली पाळणाघर उपलब्ध करुन देता येईल. सदर पाळणाघर चालविण्यासाठी, जिल्हा परिषदेने योग्य अशा स्वयंसेवी संस्थांची निवड करुन, त्यांच्या खर्चासाठी अनुदान द्यावे. मात्र, यासाठी लाभार्थ्यांची निवड करणे व किती अनुदान द्यावे याबाबत जिल्हा परिषदेने / स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## १.१६ जिल्ह्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरु मुलांसाठी एकरकमी अर्थसहाय्य

आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील, जिल्ह्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरु मुलांना रुपये २००० पर्यंत एकरकमी अर्थसहाय्य या योजनेखाली करता येईल. सदर मदत वस्तू स्वरुपात न देता रोख रकमेच्या स्वरुपात द्यावी. अशा होतकरु मुलांची निवड कशी करावी व प्रतिवर्षी अशा किती मुलांची निवड करावी, याबाबत जिल्हा परिषदेने / स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

---

**संपर्क : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद (सर्व)**

---

## राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना

## १.१७ निरीक्षण गृहे व विशेष गृहे

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० अंतर्गत १८ वर्षाखालील विधीसंघर्षग्रस्त मुलांना अ, वस्त्र, संरक्षण, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण व वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देऊन त्यांना समाजामध्ये जगण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करण्याकरिता निरीक्षण गृहे ही योजना राबविण्यात येते.

१८ वर्षाखालील विधीसंघर्षग्रस्त मुलांना पोलीस, सामाजिक कार्यकर्ते व त्यांचे पालक यांच्यामार्फत, बाल न्याय मंडळ (जुन्या अधिनियमातील तरतुदीनुसार बाल न्यायालय) यांचेसमोर हजर केल्यानंतर त्यांच्या आदेशानुसार न्यायालयीन चौकशीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरिता निरीक्षण गृहात प्रवेश देण्यात येतो. चौकशी पूर्ण झाल्यावर विधीसंघर्षग्रस्त मुला / मुलींना विशेष गृहात पुनर्वसनाकरिता दाखल केले जाते.

मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थांमार्फत कार्यरत असलेल्या निरीक्षण गृहाकरिता खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

- कर्मचारी वर्गावरील प्रत्यक्ष खर्चापोटी १००% अनुदान अनुज्ञेय राहील.
- दरमहा दरडोई रुपये ४५० इतके परिरक्षण अनुदान अनुज्ञेय राहील. उक्त परिरक्षण अनुदानामध्ये अन्न, वस्त्र, शिक्षण, वीज, इ. सर्व बाबींवरील खर्चाचा समावेश राहील.
- वरील रुपये ४५० इतक्या परिरक्षण अनुदानाव्यतिरिक्त दरमहा दरडोई रुपये ५० इतके अनुदान इमारत भाडे, औषधे व प्रसाधन साहित्य इत्यादीकरिता अनुज्ञेय राहील.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

---

## १.१८ बाल गृह / विशेष बालगृहे

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० अंतर्गत १८ वर्षाखालील देखभाल व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण, वैद्यकीय सेवा इ. सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांचे विवाह लावणे, नोकरी अथवा व्यवसाय सुरु करण्यास मदत करुन पुनर्वसन करण्यासाठी बाल गृहे चालविण्यात येतात. तर अनैतिक व्यवासयातून मुक्त करण्यात आलेल्या मुलींकरिता विशेष बालगृहे चालविण्यात येतात.

बाल कल्याण समितीच्या (जुन्या अधिनियमातील तरतुदीनुसार बाल कल्याण मंडळ) आदेशानुसार व त्यांच्या वयोगटानुसार ० ते ६ वर्षे वयोगटातील मुला / मुलींना प्राथमिक बालगृहात ७ ते १२ वर्षे वयोगटातील मुला / मुलींना कनिष्ठ बालगृहात आणि १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुला / मुलींना वरिष्ठ बालगृहात प्रवेश देण्यात येतो.

मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्थांमार्फत बाल गृहे चालविण्यासाठी खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय देय राहील :

- एड्सग्रस्त व मतिमंद मुलांच्याकरीता कार्यरत संस्थाना व त्या व्यतिरिक्त कार्यरत संस्थांच्या प्रवेशिताच्या अन्न, वस्त्र व इतर गरजा

भागविण्यासाठी अनुक्रमे रु. ६५०/- व ५००/- आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय बाबींसाठी रु. २५०/- याप्रमाणे अनुक्रमे रु. ९०० व रु. ७५०/- याप्रमाणे सहाय्यक अनुदान देण्यात येते.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

---

## १.१९ बाल सदन

समाजातील १८ वर्षाखालील अनाथ, निराधार, बेघर, तसेच सामाजिक-दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या आणि संरक्षणाची व निवाऱ्याची गरज असणाऱ्या मुला / मुलींना कौटुंबिक वातावरण उपलब्ध करुन देणे तसेच शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत बालसदने चालविण्यात येतात. या योजनेखाली १० मुला / मुलींचे एक युनिट असून, १० मुलांचे एक याप्रमाणे १० बाल सदनांच्या समुहास 'बालग्राम' असे संबोधले जाते. १८ वर्षाखालील अनाथ, निराधार, निराश्रित मुला / मुलींना सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईक, पालक अथवा पोलिसांमार्फत बालसदनात दाखल करता येते.

वरील प्रवर्गातील मुला / मुलींना संस्थेच्या मंजूर प्रवेशित क्षमतेनुसार जागेच्या उपलब्धतेनुसार संस्थेत प्रवेश देण्यात येईल. एड्सग्रस्त व मतिमंद मुलांच्याकरीता कार्यरत संस्थांना व त्याव्यतिरिक्त अन्य संस्थांना प्रवेशितांच्या अन्न, वस्त्र, निवारा व इतर गरजा भागविण्यासाठी अनुक्रमे दरमहा दरडोई रु. ६५०/- व रु. ५००/- आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय बाबींसाठी रु. २५०/- याप्रमाणे अनुक्रमे रु. ९००/- व रु. ७५०/- सहाय्यक अनुदान देण्यात येते.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

## १.२० बालकाश्रम

समाजातील १८ वर्षाखालील निराश्रित, पूर्णत:, अनाथ, पालक असून सांभाळण्यास असमर्थ असलेल्या मुलां/मुलींना संरक्षण, अ, वस्त्र, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण, वैद्यकिय सेवा देऊन नोकरी, व्यवसाय मिळवून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत बालकाश्रम चालविण्यात येतात.

१८ वर्षाखालील अनाथ, निराधार, निराश्रित मुलां/मुलींना सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईक,पालक अथवा पोलिसांमार्फत बालकाश्रमात दाखल करता येईल. स्वयंसेवी संस्थामार्फत बालकाश्रम चालविण्यासाठी एड्सग्रस्त व मतिमंद मुलांच्याकरीता कार्यरत संस्थांना व त्याव्यतिरिक्त अन्य संस्थांना प्रवेशितांच्या अन्न, वस्त्र, निवारा व इतर गरजा भागविण्यासाठी अनुक्रमे दरमहा दरडोई रु. ६५०/- व रु. ५००/- आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय बाबींसाठी रु. २५०/- याप्रमाणे अनुक्रमे रु. ९००/- व रु. ७५०/- सहाय्यक अनुदान देण्यात येते.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

---

## १.२१ अनाथालये

१८ वर्षाखालील निराधार, निराश्रित, उपेक्षित मुलां/मुलींना अ, वस्त्र, निवारा, शिक्षण, प्रशिक्षण व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देऊन त्यांना नोकरी, व्यवसाय मिळवून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत अनाथालये चालविण्यात येतात.

१८ वर्षाखालील अनाथ, निराधार, निराश्रित मुलां/मुलींना सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईक, पालक अथवा पोलिसांमार्फत अनाथालयात दाखल करता येईल. स्वयंसेवी संस्थामार्फत अनाथालय चालविण्यासाठी एड्सग्रस्त

व मतिमंद मुलांच्याकरीता कार्यरत संस्थांना व त्याव्यतिरिक्त अन्य संस्थांना प्रवेशितांच्या अन्न, वस्त्र, निवारा व इतर गरजा भागविण्यासाठी अनुक्रमे दरमहा दरडोई रु. ६५०/- व रु. ५००/- आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय बाबींसाठी रु. २५०/- याप्रमाणे अनुक्रमे रु. ९००/- व रु. ७५०/- सहाय्यक अनुदान देण्यात येते.

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

## १.२२ बाल संगोपन योजना

०ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ बेघर, निराश्रित व अन्य प्रकारे गरजू बालकांना संस्थेत दाखल करून घेण्याऐवजी त्यांना पर्यायी कुटुंब उपलब्ध करून व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास होण्याकरता बाल संगोपन योजना राबविण्यात येते. सदर योजना शासनातर्फे व स्वयंसेवी संघटनेच्या सहकार्याने राबविण्यात येते. बालकांना कुटुंबात सांभाळण्यासाठी, त्याला कौटुंबिक वातावरण उपलब्ध करून देऊन संगोपनासाठी कुटुंबास दरमहा रूपये २५० इतके अनुदान देण्यात येते.

मान्यताप्राप्त स्वयंसेवी संघटनांना योजना राबविण्यासाठी अशी कुटुंबे मिळवून देण्यासाठी पालकांना प्रवृत्त करणे व त्या कुटुंबात संगोपनासाठी बालक दिल्यानंतर त्या बालकाचे संगोपन, त्या कुटुंबात योग्यप्रकारे होत की, नाही हे वरचेवर तपासण्यासाठी दरमहा रूपये ५० इतके प्रोत्साहन अनुदान देण्यात येते.

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

## १.२३ बाल मार्गदर्शन केंद्र व बाल चिकित्सा केंद्र

गलिच्छ वस्ती व झोपडपट्टीत कोणत्याही गटातील कोणत्याही प्रकारातील मुले, मुली यांचेकरिता खालील उद्देशासाठी बाल मार्गदर्शन केंद्रे व बाल चिकित्सा केंद्रे स्थापन करण्यात आली आहे.

- मुलांना विधायक कार्यात गुंतवून त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीस आळा घालण्याचा प्रयत्न करणे.
- मुलांचा मानसिक वर्तणुकीविषयी व भावनिक समस्यांचा विचार करून मुलांना व त्यांच्या पालकांना मार्गदर्शन व उपचार देणे.
- मानसोपचारतज्ञ, बालरोगतज्ञ इत्यादींचा सेवा उपलब्ध करून देणे.
- वाचनालय, बालवाडी, खेळाचे साहित्य वर्तमानपत्रे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे.

बाल मार्गदर्शन केंद्र चालविण्यासाठी रुपये ३,००० वार्षिक अनुदान अनुज्ञेय आहे. बाल चिकीत्सा केंद्र चालविण्यासाठी वार्षिक रुपये १०,००० अनुदान अनुज्ञेय आहे.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

---

## १.२४ अनुरक्षण वसतिगृह व राज्यगृहे

- बालगृहातील मुलांचा वास्तव्यकाल संपल्यानंतर संस्थेतून बाहेर पडताना ज्या मुलांच्या पुनर्वसनाची योग्य व्यवस्था झालेली नसेल, अशा मुलांना त्यांचे अपुरे राहिलेले शिक्षण / प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी तसेच नोकरी किंवा व्यवसाय मिळेपर्यंत राहण्यासाठी अनुरक्षण वसतिगृहे व राज्यगृहे चालविण्यात येतात. अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थेत दाखल झालेल्या मुलाच्या वयाची १७ वर्षे पूर्ण होताच त्याच्या पुनर्वसनासाठी त्याला अनुरक्षण गृहात दाखल करता येते आणि अशा वेळी ते मुल वयाची २० वर्षे पूर्ण होईपर्यंत अनुरक्षण गृहात राहू शकते. एड्सग्रस्त व मतिमंद मुलाकरीता व

त्या व्यतिरिक्त पुरुष अथवा महिला राज्यगृह / अनुरक्षण गृह चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना केवळ प्रवेशिताच्या अन्न, वस्त्र व इतर गरजा भागविण्यासाठी अनुक्रमे दरमहा दरडोई रु. ६५०/- व रु. ५००/- आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी दरमहा दरडोई रु. २५०/- असे एकूण अनुक्रमे रु. ९००/- व रु. ७५०/- या प्रमाणे सहाय्यक अनुदान शासनामार्फत अनुज्ञेय आहे.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)**

---

## १.२५ एकात्मिक बाल विकास सेवा योजना

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून भारत सरकारने १९७५-७६ मध्ये सुरु केली आहे. या योजनेतील उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत

- ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना पूरक पोषण आहार देऊन त्यांच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे.
- मुलांच्या योग्य मानसिक, शारिरीक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.
- पोषण आहार आणि आरोग्य शिक्षण देऊन मुलांचे सर्वसाधारण आरोग्य आणि पोषण आहार या संबंधीच्या गरजांची अधिक चांगली काळजी घेऊ शकतील अशाप्रकारे त्यांची क्षमता वाढविणे.
- बाल विकासास चालना मिळावी म्हणून धोरण व अंमलबजावणी या बाबत विविध खात्यांमध्ये प्रभावी समन्वय घडवून आणणे.

या योजनेचा लाभ दुर्बल घटकात मोडणाऱ्या म्हणजे अनुसूचित जाती जमातीतील कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील कुटुंब मोलमजुरी करुन उपजिविका करणारे अशा कुटुंबातील ६ वर्षाखालील मुले व १५ ते ४५ वयोगटातील गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना देण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ० ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना पूरक पोषण आहार पुरविला जातो. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महिन्यातील २५ दिवस याप्रमाणे वर्षातील ३०० दिवस पूरक पोषण आहार पुरविण्यात येतो. या योजनेंतर्गत लाभधारकास १० ते १२ ग्रॅम प्रथिने व ३५० उष्मांकयुक्त पूरक पोषण आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते १ वर्षे वयोगटातील मुलांना व १ ते ६ वर्षे वयोगटातील अतिकुपोषित (ग्रेड ३ व ग्रेड ४) मधील बालकांना उपचारशास्त्रभूत आहार (थेरेप्युटिक फूड) देण्यात येतो.

---

**संपर्क : बाल विकास प्रकल्प अधिकारी, शहरी प्रकल्प**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी, आय.सी.डी.एस. प्रकल्प, (सर्व तालुके)**

---

## १.२६ नवसंजीवन योजना

राज्याच्या अतिदुर्गम आदिवासी भागाचा,पावसाळ्यामध्ये इतर भागांशी संपर्क तुटल्यामुळे व विविध आजार उद्‌भवल्यामुळे त्यामुळे आदिवासींना योग्य प्रमाणात आहार मिळण्यास अडचण निर्माण होते व बालमृत्यूसारख्या घटना घडतात. यावर मात करण्याकरिता व आदिवासी बालके आणि स्त्रियांना पूरक पोषण आहार उपलब्ध करून देण्याकरिता नवसंजीवन योजनेअंतर्गत वाढीव पुरक पोषण आहार योजना सन १९९७ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना वाढीव पूरक आहार देण्यात येतो.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ४० आदिवासी प्रकल्पांपैकी खाली नमूद केलेल्या १५ अतिसंवेदनशील प्रकल्पांत नवसंजीवन योजनेअंतर्गत वाढीव पूरक पोषण आहार योजना सुरु केली आहे.

---

**संपर्क : बाल विकास प्रकल्प अधिकारी, आय.सी.डी.एस. प्रकल्प, (सर्व तालुके)**

---

## १.२७ प्रधानमंत्री ग्रामोदय योजना

राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री ग्रामोदय योजनेतंर्गत अतिरिक्त पूरक पोषण आहार वर्षातील काही दिवस पुरविण्यात येतो.

---

**संपर्क : बाल विकास प्रकल्प अधिकारी, आय.सी.डी.एस. प्रकल्प, (सर्व तालुके)**

---

## १.२८ बालिका समृद्धी योजना

१५ ऑगस्ट १९९७ नंतर जन्म झालेल्या मुलींसाठी बालिका समृद्धी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येते.

**उद्दिष्टे**

- कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या मुलीबद्दल आणि तिच्या आईबद्दल समाजात रूढ असलेल्या नकारात्मक भुमिकेत बदल घडवून आणणे.
- मुलींची शाळेमधील पट संख्या वाढविणे आणि मधूनच शाळा सोडण्याची वृत्ती कमी करण्याचा प्रयत्न करणे.
- मुलींचे वय कमी असताना लग्न करण्यापासून परावृत्त करणे,
- स्वत:चे उत्पन्न वाढविण्यासाठी मुलीने हाती घेतलेल्या उद्योगास अर्थसहाय्य करणे.

**लाभार्थी :** या योजनेखाली दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १५ ऑगस्ट १९९७ नंतर जन्मलेल्या मुलीस अर्थसहाय्य देण्यात येईल. हे अर्थसहाय्य कुटुंबातील जास्तीत जास्त दोनच मुलींना देण्यात येईल. ही योजना ग्रामीण तसेच शहरी भागातही लागू राहील. शहरी भागात ज्या ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण झालेले नाही त्या ठिकाणी शिधावाटप योजनेखालील विशिष्ट लाभार्थींना या योजनेचा लाभ देता येईल. ज्या ठिकाणी याद्या उपलब्ध नसतील त्या ठिकाणी शहरी झोपडपट्टीत राहणाऱ्या मुली तसेच कचरा गोळा करणे, भाजीपाला, मासे व फुले विक्रेते इ. या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.

अनुदान : या योजनेखाली मुलीच्या जन्मानंतर रूपये ५०० इतके अनुदान देण्यात येईल. हे अनुदान मुलीच्या नावावर सार्वजानिक भविष्य निर्वाह निधी योजना, राष्ट्रीय बचत योजना यासारख्या जादा व्याज मिळणाऱ्या ठेवी प्रकारात गुंतविण्यात यावी. हे दोन्हीही शक्य नसेल तेव्हा उक्त रक्कम मुलीच्या नांवे बचत खात्यात जमा करण्यात यावी. या रक्कमेपैकी भाग्यश्री बालिका विमा योजना या योजनेचा प्रिमियम भरण्यासाठी वापरता येईल.उर्वरित रक्कम वरील पद्धतीने गुंतवता येईल.

उक्त लाभार्थी शाळेत जाऊ लागल्यानंतर दरवर्षी परिक्षा उतीर्ण झाल्यावर तिला खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल :-

| | |
|---|---|
| अ) पहिली ते तिसरी | रूपये ३०० दरवर्षी |
| ब) चौथी | रूपये ५०० दरवर्षी |
| क) पाचवी | रूपये ६०० दरवर्षी |
| ड) सहावी व सातवी | रूपये ७०० दरवर्षी |
| ई) आठवी | रूपये ८०० दरवर्षी |
| ई ) नववी व दहावी | रूपये १,००० दरवर्षी |

सदरची रक्कम दरवर्षी वरील परिच्छेदातून नमूद केल्याप्रमाणे बँकेत अथवा पोष्टात लाभार्थींच्या नावे गुंतवता येईल. या रकमेपैकी काही रक्कम मुलीला पाठ्यपुस्तके घेण्यासाठी किंवा गणवेष खरेदी करण्यासाठी अथवा भाग्यश्री बालिका कल्याण योजनेचा प्रिमियम वापरता येईल.

---

**संपर्क : बाल विकास प्रकल्प अधिकारी, शहरी प्रकल्प**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी, आय.सी.डी.एस. प्रकल्प, (सर्व तालुके)**

---

## १.२९ देवदासींच्या मुलां-मुलींकरिता वसतीगृहे चालविणे

या विभागाच्या अधिपत्याखाली देवदासींच्या मुलां-मुलींकरिता जत, जि. सांगली व गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या ठिकाणी प्रत्येक एक याप्रमाणे एकूण २ वसतिगृहे चालविण्यात येत आहेत. त्यांची लाभधारक मंजूर

संख्या प्रत्येकी ७५ इतकी आहे. या वसतिगृहांमध्ये देवदासींच्या मुलां-मुलींना अ, वस्त्र, निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या प्रित्यर्थ स्वंयसेवी संस्थांना दरडोई दरमहा रूपये ७५०/- इतके परिरक्षण अनुदान देण्यात येते. यामधील रु. ५००/- हे अनुदानाची रक्कम केवळ प्रवेशिताच्या अन्न, वस्त्र व इतर गरजा भागविण्यासाठी आणि रु. २५०/- वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार इत्यादी प्रशासकीय बाबीसाठी देण्यात येतात.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सांगली, कोल्हापूर)**

---

## १.३० देवदासींच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत

देवदासींच्या इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या मुला-मुलींना गणवेशाचे संच व लेखनसाहीत्य याकरिता शासनामार्फत खालील दराने अनुदान देण्यात येते.

| | *प्रति विद्यार्थी* |
|---|---|
| १. क्रमांक पुस्तके | रू. ७५/- |
| २. वह्या | रू. ७५/- |
| ३. इतर शालेय साहित्य | रू. ५०/- |
| ४. गणवेश (मुले) | रू. १७५/- |
| ५. गणवेश (मुली) | रू. २०५/- |

अनुदान मंजुरीचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांना आहेत.

---

**संपर्क : जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## २. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

### २.१ प्रियदर्शनी वसतिगृहे

ग्रामीण व आदिवासी विभागातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत यांना शैक्षणिक क्षेत्रामध्येप्रगती करता यावी, म्हणून शासन निर्णय क्रमांक - टीडीब्ल्यूएच १०१०/१५६-१३३ (४१) विशि -५ दिनांक ११/१९९० नुसार तालुक्याच्या ठिकाणी ५०मुलींची सोय असलेले प्रियदर्शनी वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. ही योजना माजी दिवगंत पंतप्रधान श्रीमती इदिंरा गांधी यांच्या स्मरणार्थ राज्य सरकारने सुरु केलेली आहे. या वसतिगृंहामध्ये मुलींना मोफत निवास व्यवस्था, जेवण इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

या योजनेखाली प्रतिवर्षी दरमहा रूपये ३३५ या दराने प्रत्येक लाभार्थीसाठी अनुदान देण्यात येते. हे अनुदान एका वर्षातील जास्तीत जास्त १० महिन्यांकरिता मिळते. याशिवाय अधीक्षकाच्या वेतनासाठी जास्तीत जास्त रूपये ६०० दरमहा या मर्यादित सहायक अनुदान देण्यात येते. स्वयंसेवी संस्थेस पहिल्या वर्षी भांडी, फर्निचर इत्यादी खरेदीसाठी रूपये ५०० अनावर्ती अनुदान तर व्यवस्थापनेवरील खर्चास रूपये १,५०० इतके आवर्ती अनुदान देय आहे.

---

संपर्क : संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, मुंबई

---

### २.२ मुलींकरीता शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये ग्रंथालयाचा विस्तार

मुलींकरीता शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये ग्रंथालयाचा विस्तार २२३०-कामगार कल्याण १.१०६ योजनांतर्गत औ. प्र. संस्थांमध्ये मुलींसाठी व्यवसाय अभ्यासक्रम व एकत्रित अभ्यासक्रमांमध्ये २५% महिला आरक्षण २.९४ योजनेत्तर औ. प्र. संस्थांमधील मुलींसाठी व्यवसाय अभ्यासक्रम.

---

संपर्क : संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, मुंबई

---

## ३. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

### ३.१ इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती प्रदान करणे

इयत्ता ५ वी ७ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी (अनुसूचित जाती, विमुक्त जाती /भटक्या जमाती, धनगर व वंजारीसह तसेच विशेष मागासवर्ग) दरमहा रूपये ३० प्रमाणे प्रत्येकी शैक्षणिक वर्षात १० महिने शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती योजना गुणवत्ता शिष्यवृत्तीव्यतिरिक्त आहे. या योजनेचे, मुलींची शाळेतील गळती रोखणे ही प्रमुख उद्दिष्ट आहे.

संपर्क :
- संचालक, सामाजिक न्याय संचालनालय, पुणे
- संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग संचालनालय, पुणे
- विशेष समाज कल्याण अधिकारी (सर्व जिल्हे)

### ३.२ इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींसाठी सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून 'सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना' सुरु करण्यात आली. या योजने अंतर्गत इयत्ता ८ वी ते १० वी मधील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी दरमहा रु. १००/- इतकी शिष्यवृत्ती माहे जून ते मार्च या शैक्षणिक १० महिन्यासाठी देण्यात येते.

संपर्क :
- संचालक, सामाजिक न्याय संचालनालय, पुणे
- संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग संचालनालय, पुणे
- विशेष समाज कल्याण अधिकारी (सर्व जिल्हे)

## ३.३ आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींकरता शासकीय वसतिगृह

आर्थिकदृष्टया मागासलेल्या पालकांच्या मुलींना शहराच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे याकरिता वसतिगृहाची सोय करण्यात आलेली आहे. या वसतिगृहात राहण्यासाठी जागा,विनामूल्य भोजन, पाठ्यपुस्तके, लेखनसामुग्री, वैद्यकीय सहाय्य इ. सुविधा पुरविण्यात येतात.

मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलीसाठी शैक्षणिक सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाकडून त्यांच्याकरिता वसतिगृह ही योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत वसतिगृमध्ये प्रवेश दिलेल्या मुलींची राहण्याची, जेवणाची विनामुल्य सोय करण्यात येते. त्याशिवाय त्यांचा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी गणवेश, पुस्तके, सतरंजी, बिछाने, वैद्यकीय सुविधा, बस पासेस इत्यादी बाबी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात. मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींकरता एकूण ७२ वसतिगृहे आहेत. लाभार्थींची मान्य संख्या ५१४५ आहे.

---

**संपर्क : संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## ३.४ मागासवर्गीय मुला-मुलींकरीता शासकीय वसतिगृह

मागासवर्गीय मुलींना शैक्षणिक सवलतीचा फायदा घेणे शक्य व्हावे म्हणून शासनाने वसतिगृहाची सोय केलेली आहे. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थीनींना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. वसतिगृहात त्यांना राहण्याची जागा, विनामूल्य भोजन, पाठ्यपुस्तके इ. सुविधा पुरविण्यात येतात. राज्यात मुलींसाठी अशी एकूण ११४ वसतिगृहे आहेत. सन २००३-२००४ मध्ये मुलींसाठी ७ नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत. प्रत्येक विद्यार्थीनीला विभागीय स्तरावर दरमहा दरडोई रु. २००/- जिल्हा स्तरावरील वसतीगृहातील प्रवेशितांना रु. ७५/- व इतर ठिकाणी दरमहा दरडोई रु. ५०/- निर्वाह भत्ता, प्रवास, तेल, साबण, केशकर्तन इत्यादी

खर्चासाठी देण्यात येतो. स्पर्धात्मक परीक्षांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थींनी ह्या सर्वसाधारण विद्यार्थीनींप्रमाणे सक्षम होण्याच्या दृष्टीने शासकीय वसतीगृहातील विद्यार्थीनींना ज्यादा सोई-सुविधा पुरविण्यात येत आहेत.

---

**संपर्क : संचालक, सामाजिक न्याय संचालनालय, पुणे**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## ३.५ मागासवर्गीय मुला-मुलींकरिता स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहाकरिता सहाय्य

अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आदिवासी आश्रमशाळेच्या धर्तीवर स्वयंसेवी संस्थामार्फत आश्रमशाळा / वसतिगृह सुरु करण्यात आलेली आहेत.स्वयंसेवी संस्थांना यासाठी परिरक्षण अनुदान वेतनेतर मान्य बाबीकरिता अनुदान, इमारत भाडे व इमारत बांधकाम अनुदान तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच आवश्यक अन्य साधनसामुग्रीकरिताही अनुदान मंजुर करण्यात येते. सध्या राज्यात अशा १० प्राथमिक आश्रमशाळा व १ माध्यमिक आश्रमशाळा आहे.

मागासवर्गीय मुलां मुलीकरिता शैक्षणिक सवलतींचा लाभ घेता यावा व त्यांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जा सुधारण्याची संधी त्यांना मिळावी म्हणून, शासनाने त्यांच्यासाठी शासकीय वसतिगृह व्यतिरिक्त स्वयंसेवी संस्थामार्फत वसतिगृह मान्यता व अनुदान ही योजना राबविली आहे. या योजनेअंतर्गत राज्यात एकूण २२८७ वसतिगृहे असून त्यापैकी मुलींकरिता ४०६ वसतिगृहे आहेत. मुलींसाठी ३३ नवीन अनुदानित वसतिगृहे सुरु करण्यात येत आहेत.

---

**संपर्क : संचालक, सामाजिक न्याय संचालनालय, पुणे**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व जिल्हे)**

---

## ४. शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

### ४.१ दुर्बल घटकातील मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता

शाळेमध्ये दाखल करण्यात आलेल्या मुलांपैकी मुलींचे गळतीचे प्रमाण अधिक आहे. हे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि सामाजिक न्याय देण्यासाठी समाजातील अनुसूचित जाती/जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या मुलींना पालकांना उपस्थिती भत्याच्या स्वरूपात प्रोत्साहन रक्कम देण्यात येते. एका शैक्षणिक वर्षातील कामाच्या २२० दिवसांसाठी दरदिवशी रूपये १ प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्यात येतो. तथापि या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रामीण क्षेत्राकरिता कुटुंबाची उत्प मर्यादा दरसाल रूपये १०,००० आणि नागरी क्षेत्राकरिता दरसाल रूपये ११,८५० इतकी निश्चित करण्यात आलेली आहे.

---

**संपर्क : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व जिल्हे)**

---

### ४.२ अहिल्यादेवी होळकर मुलींना मोफत प्रवास योजना

ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना एस.टी. ने शाळेत जाण्या - येण्यासाठी मोफत प्रवास सवलत योजना सुरु करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील पालकांची आर्थिक स्थिती गरिबीची असल्यामुळे, ग्रामीण भागातील मुले शाळेत येऊ शकत नाहीत. मुलींना शाळेत दाखल करण्याकरिताच पालकांना प्रवृत्त करणे व शाळेत टिकवून ठेवणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यावर होणारा खर्च नव्याने विहित केलेल्या पद्धतीनुसार राज्य परिवहन महामंडळाकडून राज्यशासनाला जो कर दिला जातो, त्यातून परस्पर समायोजित करण्यात येणार आहे.

---

**संपर्क : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व जिल्हे)**

---

## ४.३ महिला सैनिकी शाळा

राज्यात प्रत्येक जिल्हयात एक सैनिकी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, पुणे जिल्हयात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे या संस्थेमार्फत केवळ मुलींसाठी सैनिकी शाळा सुरू करण्यात आली आहे. मुलींना सैनिकी प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम बनविणे हे या मागचे मुख्य उद्दिष्ट आहे. ही सैनिकी शाळा १९९७-९८ पासून सुरु करण्यात आलेली आहे. चालू वित्तीय वर्षी बुलढाणा येथे नवीन सैनिकी शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

**संपर्क : आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**संचालक, मुलींसाठी सैनिक शाळा, महाराष्ट्र राज्य, पुणे, बुलढाणा**

---

## ४.४ मुलींची पटसंख्या वाढविण्यासाठी प्राथमिक शिक्षकांना उत्तेजनार्थ पारितोषिके

ग्रामीण भागात मुलींना शाळेत पाठविण्यास पालक इच्छुक नसतात, अशा परिस्थितीत शिक्षणाचे महत्व पटवून देऊन मुलींना शाळेत पाठविण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्राथमिक शिक्षकांची मदत घेण्यात येते व त्याकरिता त्यांना पारितोषिके देण्यात येतात.

---

**संपर्क : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व जिल्हे)**

---

## ४.५ इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण

मुलींना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणे व मधूनच शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी इयत्ता १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते.

---

**संपर्क : शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (सर्व जिल्हे)**

---

## ४.६ मुलींसाठी मोफत अध्यापन पदविका

मुलींनी मधूनच शाळा सोडू नये, त्यांनी आर्थिकदृष्ट्या सबल बनावे व स्वावलंबी व्हावे याकरिता मोफत अध्यापन पदविका शिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे.

---

**संपर्क : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व जिल्हे)**

# ५. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

## ५.१ सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना

ज्या कुटुंबाने एक मुलगी अथवा दोन मुलींनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली असेल व ज्याला मुलगा नाही त्यांचे साठी ही प्रोत्साहनात्मक बक्षिस योजना जाहिर केली आहे. या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- महिलांच्या सामाजिक दर्जामध्ये सुधारणा घडवून आणणे.
- आरोग्य व बाल आरोग्य कार्यक्रमास प्रसिद्धी देणे.
- कुटुंबाचा आकार लहान ठेवण्याचे मापदंड पाळून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे.

या योजनेखाली फक्त दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील दाम्पत्यास लाभ घेता येईल. ते महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शासन मान्यता प्राप्त रूग्णालयातून करून घेणे आवश्यक आहे. या योजनेखाली मुलींना १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून देण्यातयेणारी रक्कम रूपये १०,००० मुदत / कायम ठेव स्वरूपात ठेवण्यात येते. लाभार्थी मुलींना २० वर्षापर्यंत विवाह न केल्यास त्यांना दहावीची परीक्षा उतीर्ण झाल्यानंतर रूपये ५,००० इतकी जादा रक्कम प्रोत्साहनात्मक बक्षिस म्हणून देण्यात येईल. ही रक्कमही पाच वर्षाच्या मुदत ठेवीच्या स्वरूपात असते.

---

**संपर्क :** **जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका**
**मुंबईकरिता : विशेष अधिकारी, कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ-उत्तर विभागीय कार्यालय, परळ, मुंबई १२.**

---

# निर्देशिका

| अ. क्र. | विभागाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्र. |
|---|---|
| १. | **महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन** |
| अ) | आयुक्तालय<br>आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय<br>३, चर्च रोड, पुणे ४११ ००१<br>दूरध्वनी : ९५२०-२६१२६६९०<br>फॅक्स : ०२०-२६११९०६५ / २६१२७४२६<br>E-mail : commissionerwcd@vsnl.net<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई**<br>बीडीडी चाळ क्र. ११७ समोर<br>वरळी, मुंबई<br>दूरध्वनी : ९५२२-२४९२२४८४<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर**<br>नवीन प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग<br>चेंबूर (पूर्व)<br>दूरध्वनी : ९५२२-२५२३२३०८<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे**<br>लक्ष्मीकृपा तळमजला, शिवसेना शाखेजवळ<br>चरई, ठाणे, जि. ठाणे<br>दूरध्वनी : ९५२२-२५३३०७५२ |

महिला व बाल विकास विभाग

| अ. क्र. | विभागाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्र. |
|---|---|
| | • **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड**<br>श्रीबाग नं. २, प्लॉट नं. एम. १९, अलिबाग, रायगड<br>दूरध्वनी : ९५२१४१-२२५३२१<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रत्नागिरी**<br>डॉ. आंबेडकर औद्योगिक कार्यालयाजवळ<br>रत्नागिरी<br>दूरध्वनी : ९५२३५२-२२०४६१<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सिंधुदुर्ग**<br>जिल्हा मुख्यालय इमारत औरस, ता. कुडाळ<br>जि. सिंधुदुर्ग<br>दूरध्वनी : ९५२३६२-२२८८६९<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे**<br>२८, राणीचा बाग, जुन्या सर्कीट हाऊसजवळ,<br>पुणे ४११ ००१<br>दूरध्वनी : ९५२०-२६३६१६१८<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सातारा**<br>नवीन प्रशासकीय इमारत,<br>जिल्हा परिषद, सातारा<br>दूरध्वनी : ९५२१६२-२३७३५३<br><br>• **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, कोल्हापूर**<br>मध्यवर्ती शासकीय इमारत जिल्हा पोलिस<br>कार्यालयाजवळ, कसबा बावडा, कोल्हापूर<br>दूरध्वनी : ९५२३१-२६६१७८८ |